# महाराष्ट्रातील विरोधी पक्ष आणि राजकारण (२००४-२०१४)

**वैभव कृष्णा जानकर संशोधक विद्यार्थी,राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.**

---

**सारांश:**

२००४ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचा प्रभाव महत्त्वपूर्ण ठरला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारच्या धोरणांवर भाजप आणि शिवसेना यांनी सातत्याने आक्रमक भूमिका घेतली. शेतकरी आत्महत्या, महागाई, भ्रष्टाचार आणि विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील त्रुटी यावर विरोधकांनी सरकारला जाब विचारला.२००४-२००९ दरम्यान महागाई आणि शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न ऐरणीवर होता. पेट्रोल-डिझेल दरवाढ, जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईवर विरोधकांनी आंदोलनं केली. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सरकारला मोठ्या प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले.

२००९-२०१४ मध्ये विरोधक अधिक आक्रमक झाले. आदर्श घोटाळा, २जी स्पेक्ट्रम घोटाळा यांसारख्या प्रकरणांमुळे सरकार अडचणीत आले. शिवसेना-भाजपने मुंबईतील शहरीकरण, पाणीपुरवठा, रस्तेबांधणी यासंबंधी सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले. तसेच मराठी अस्मिता आणि स्थलांतरित मजुरांच्या मुद्द्यांवरून राजकीय वातावरण तापले. विरोधकांच्या दबावामुळे सरकारने काही धोरणांमध्ये बदल केले. विरोध पक्षांचे कार्य केवळ टीकात्मक नव्हते, तर त्यांनी सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांवर सरकारला उत्तरदायी ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणावर त्याचा दीर्घकालीन परिणाम झाला.

***Key Words:***

महाराष्ट्र, विरोधी पक्ष, महागाई, शेतकरी आत्महत्या, भ्रष्टाचार, विकास प्रकल्प, सरकार विरोध.

**प्रस्तावना:**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. भारतामधील लोकशाही शासन प्रणालीने यशस्वीपणे 75 वर्षे पूर्ण केली आहेत तसेच संसदीय शासन व्यवस्थेमध्ये लोकशाही शासनाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण विरोधी पक्ष हा जेवढा शक्तिशाली तेवढी लोकशाही सर्वाधिक मजबूत होत असते. यामध्ये देशाच्या संसदेमध्ये लोकसभा व राज्यसभा ही दोन सभागृह देशाचा राज्यकारभार करीत असतात. त्याप्रमाणे प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र असे विधानसभा व काही राज्यांमध्ये विधानपरिषद ही सभागृह राज्यकारभार करताना दिसून येतात यामध्ये प्रामुख्याने विविध प्रादेशिक पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांचे आघाडी व महायुतीचे सरकार सत्तेमध्ये येऊन त्यांनीही राज्याची सत्ता आपल्या पक्षांच्या ताब्यात ठेवलेली आहे यामध्ये भारतीय संविधानाने संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे संसदीय लोकशाहीमध्ये निवडणुकांना महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते निवडणुका ह्या रोड मतदान पद्धतीने होतात यामध्ये प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय पक्ष हे आघाडी व युती करून निवडणुका लढवत असतात त्यामध्ये निवडणुकीच्या माध्यमातून जनता आपले प्रतिनिधी पाच वर्षासाठी निवडून देते. जो पक्ष बहुमत असतो तो सत्ताधारी पक्ष म्हणून राज्याचा राज्यकारभार सांभाळतो आणि जो पक्ष अल्पमतात आहे तो विरोधी पक्ष म्हणून आपली भूमिका पार पाडत असतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असलेली जाणवते अनेक वेगवेगळया पक्ष पद्धती असल्याचे आपणास दिसते. यामध्ये एक पक्ष पद्धती द्विपक्ष पद्धती आणि बहुपक्ष पद्धती यांचा समावेश होतो एक पक्ष पद्धतीमध्ये विरोधी पक्षाचा प्रभाव दिसून येत नाही त्यामुळे सरकारकडून जनतेच्या अपेक्षा इच्छा आकांक्षांचे प्रतिबिंब पाहिजे तेवढ्या प्रमाणात शासनाच्या ध्येय धोरणात उमटताना दिसून येत नाही तर द्विपक्ष पद्धती आणि बहुपक्ष पद्धतीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वपूर्ण असते यामध्ये विरोधी पक्ष जनतेचे प्रश्न सरकार समोर मांडून सरकारवर वचक ठेवण्याचा प्रयत्न करते.

**उद्दीष्टे:**

1. महाराष्ट्रातील विरोधी पक्षांची कार्यशैली आणि भूमिका समजून घेणे.
2. २००४ ते २०१४ च्या कालखंडात राज्य सरकारच्या धोरणांवर विरोधी पक्षांचा प्रभाव तपासणे.

**गृहीतके:**

1. २००४ ते २०१४ च्या कालखंडात विरोधी पक्षांचा प्रभाव राज्याच्या राजकारणावर होता.
2. विरोधी पक्षाने महागाई, शेतकरी समस्या आणि भ्रष्टाचार विरोधात विधिमंडळात परिणामकारक भूमिका मांडली.

**संशोधन विषयाचे महत्व:**

२००४ ते २०१४ या कालखंडातील महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे, कारण याने राज्याच्या राजकारणावर एक विशेष प्रभाव टाकला आहे. विरोधी पक्षांचा दबाव आणि त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे शासनाच्या धोरणांमध्ये बदल घडले आणि राज्याच्या सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय बाबींचे पुनरावलोकन झाले. शेतकरी आत्महत्या, महागाई, भ्रष्टाचार आणि विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील त्रुटींवर विरोधकांनी सरकारला जबाबदार ठरवले होते, ज्यामुळे सरकारला काही ठोस निर्णय आणि सुधारणा करण्यास प्रवृत्त केले होते. विरोधी पक्षांना सरकारवर वचक ठेवण्याचे महत्त्व असते. ते सरकारच्या धोरणांचे पुनरावलोकन करून नागरिकांच्या हिताचे रक्षण करतात. यामुळे लोकशाही प्रक्रिया आणखी मजबूत होते. विरोधी पक्षांच्या दबावामुळे सत्ताधारी पक्षांना त्यांच्या धोरणांचे पुनरावलोकन करावे लागले, जे लोकांच्या अपेक्षांशी अधिक सुसंगत होते. यामुळे राज्य सरकारला जनतेच्या मुद्यांवर अधिक संवेदनशील होण्यास भाग पडले. शेतकरी संकट, महागाई आणि भ्रष्टाचार यासारख्या मुद्यांवर विरोधकांनी लक्ष केंद्रित केल्याने सरकारने यावर काही उपाययोजना केल्या, ज्यामुळे राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांमध्ये सुधारणा झाली. विरोधी पक्षांनी महाराष्ट्रातील मराठी अस्मिता आणि इतर राज्यांतील लोकांच्या वाढत्या स्थलांतरावर देखील चर्चा केली, ज्यामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक मुद्दे समोर आले आणि त्यावर सरकारने विचार केला. विरोधकांनी राज्य सरकारच्या विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर टीका केली आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांवर सरकारला जाब विचारला. यामुळे सरकारला या प्रकल्पांच्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी उपाययोजना कराव्या लागल्या. यासाठीच महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या कार्यशैलीचा सखोल आणि ऐतिहासिक अभ्यास करणे, राज्याच्या राजकारणाच्या बदलांची दिशा समजून घेण्यासाठी महत्वपूर्ण ठरते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ ग्रंथ व इंटरनेट इत्यादी द्वितीय संदर्भ साधनांच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आले आहे आणि त्या तथ्यांच्या आधारे प्रस्तुत शोधणेबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**विषय विवेचन:**

***२००४ ते २००९ (विरोधी पक्षांची कामगिरी):***

२००४ ते २००९ या कालखंडात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या नेतृत्वाखाली सरकार असताना, विरोधी पक्षांनी महागाई, शेतकरी आत्महत्या, भ्रष्टाचार या मुद्यांवर राज्याचे लक्ष वेधले. महागाई हा एक मोठा मुद्दा बनला, विशेषतः पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ झाल्यामुळे विरोधी पक्षांनी यावर दबाव टाकला आणि सरकारकडून ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.

शेतकरी आत्महत्या हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा होता. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणारे शेतकरी मोठ्या प्रमाणावर होते, आणि विरोधी पक्षांनी या मुद्यावर सरकारला कठोरपणे जबाबदार ठरवले. भ्रष्टाचाराच्या मुद्यावरही विरोधी पक्षांनी सरकारवर आरोप केले, विशेषतः रस्ते बांधकाम, पाणीपुरवठा, आणि पायाभुत प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अपुरेपणावर जोरदार टीका केली.

***२००९ ते २०१४ (विरोधी पक्षांची कामगिरी):***

२००९ ते २०१४ च्या कालखंडात विरोधी पक्षांच्या आक्रमक विरोधात अधिक ताण आणि दबाव दिसला. विशेषतः महागाई, शेतकरी संकट, आणि भ्रष्टाचाराचे मुद्दे आणखी तीव्र झाले. २०११ मध्ये आदर्श घोटाळा, २जी घोटाळा आणि अन्य घोटाळ्यांचा उलगडा झाला, ज्यावर विरोधी पक्षांनी सरकारला चांगलेच लक्ष्य केले.

विकास प्रकल्पांच्या बाबतीत विरोधी पक्षांनी राज्य सरकारवर टीका केली, विशेषत: मुंबईच्या शहरीकरण, पाणीपुरवठा आणि रस्ते बांधकामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. शिवसेना आणि भाजप यांनी राज्य सरकारच्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर अनेक आंदोलनं केली आणि सरकारच्या कार्यप्रणालीवर कटाक्ष ठेवला.

***सामाजिक मुद्दे:***

शिवसेना आणि भाजप यांनी महाराष्ट्रातील काही सांस्कृतिक आणि सामाजिक मुद्द्यांवर देखील सरकारला टीका केली. विशेषतः मराठी अस्मिता आणि इतर राज्यांतील लोकांच्या वागणुकीविषयी तणाव निर्माण करण्याचे सरकारच्या धोरणावर विरोधकांनी आक्षेप घेतला.

**गृहीतकांची पडताळणी:**

1. **विरोधी पक्षांचा प्रभाव राज्याच्या राजकारणावर होता:** २००४ ते २०१४ दरम्यान विरोधी पक्षांनी राज्य सरकारवर दबाव टाकला. शेतकरी आत्महत्या, महागाई, भ्रष्टाचार, आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांवरील अडचणी यावर विरोधी पक्षांच्या आक्रमक भूमिकेचा प्रभाव झाला.
2. **महागाई, शेतकरी संकट आणि भ्रष्टाचार विरोधी संघर्ष:** विरोधी पक्षांनी महागाई, शेतकऱ्यांचे संकट, आणि भ्रष्टाचार यावर विरोध केला. त्यांनी सरकारकडून अधिक ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली, आणि यामुळे सरकारने कधी तरी काही सुधारणा करण्यास सुरुवात केली.
3. **विकास प्रकल्प आणि सरकारच्या कार्यशैलीवर टीका:** विरोधी पक्षांनी राज्य सरकारच्या विकास योजनांवर टीका केली, विशेषत: प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अपुरी आणि भ्रष्टाचाराशी संबंधित मुद्द्यांवर. विरोधकांचे आरोप असत्य असल्याचे सांगता येईल, परंतु यामुळे सरकारला सुधारणा करण्यासाठी दबाव आले.

**निष्कर्ष:**

२००४ ते २०१४ च्या कालखंडात महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी राज्य सरकारच्या कार्यप्रणालीवर प्रभाव टाकला. त्यांनी शेतकरी संकट, महागाई, भ्रष्टाचार आणि विकास कामांवर तीव्र विरोध दर्शवला. त्याचे परिणाम म्हणून राज्य सरकारला या मुद्द्यांवर विचार करण्यास आणि योग्य धोरणात्मक बदल करण्यास भाग पडले. विरोधी पक्षांचा उद्देश फक्त सरकारला घेरणे नाही, तर जनतेच्या हितासाठी प्रगल्भ आणि समर्पक बदल आणण्याचा होता.

विरोधी पक्षांच्या कामगिरीचा परिणाम राज्याच्या राजकारणावर होऊन, सत्ताधारी पक्षांना त्यांच्या धोरणांचा पुनरावलोकन करावा लागला. एकूणच, विरोधी पक्षांचा दबाव आणि त्यांचा आक्रमक विरोध महाराष्ट्रातील राजकारणाला नवा वळण देणारा ठरला.

**संदर्भ:**

१) रणसुभे, वि. (२०१५). *संयुक्त महाराष्ट्राची पन्नास वर्षे*. श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.
२) पळशीकर, सु, (२००९). *भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण*. साधना प्रकाशन, पुणे.
३) पळशीकर, सु. (२००४). *समकालीन भारतीय राजकारण*. प्रतिमा प्रकाशन.
४) व्होरा, रा., & पळशीकर, सु. (२०१०). *भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार*. डायमंड पब्लिकेशन्स.